// सा विद्या या विमुक्तये //

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

''ज्ञानतीर्थ'' परिसर, विष्णूपुरी, नांदेड–४३१ ६०६ (महाराष्ट्र)

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED**

**"Dnyanteeerth", Vishnupuri, Nanded – 431606 (Maharashtra)**

**Establishment on 17th September 1994 -Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade**

25 1994 - 2019 SILVER JUBILEE YEAR

## ACADEMIC (AFFILIATION) SECTION

Phone : (02462) 229242/43 BY REGISTERED Website : srtmun.ac.in

Fax : (02462) 229245 / 229325 e-mail :affi.srtmun@gmail.com

जा.क्र/शैक्षणिक/संलग्न–०३/हासेगांव–९६१/२०१९–२०२०/12 दिनांक :–०६.०६.२०१९

**By Registered**

प्रति,
मा. प्राचार्य,
लातूर कॉलेज ऑफ फार्मसी,
हासेगांव , ता. औसा जि. लातूर–४१३ ५१२..

विषय :– महाविद्यालयातील बी.फार्मसी या पदवी अभ्यासक्रमाच्या तात्पुरत्या संलग्निकरणा बाबत

संदर्भ :– १.या विभागाचे पत्र क्र.शैक्षणिक/संलग्न–०३/२०१८–२०१९/३३६२,दि. २८.०३.२०१९.
२. मा. अधिष्ठाता मंडळ बैठक ऐनवेळचा विषय ०३ (०८)१५–२०१९, दि. २९ एप्रिल २०१९.
३. मा.विद्या परिषद बैठक विषय क्र. २१/४३–२०१९, दि. ३०.०४.२०१९.

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्र क्र. ०१ अन्वये आपल्या महाविद्यालयातील बी.फार्मसी या अभ्यासक्रमाची स्थानिक चौकशी समिती (L.I.C.) मार्फत तपासणी करण्यात आली होती. सदर समितीने आपल्या महाविद्यालयातील उपरोक्त अभ्यासक्रमांची तपासणी करुन या संदर्भातील अहवाल विद्यापीठास सादर केला होता.

समितीने सादर केलेला अहवाल संदर्भाकिंत क्र. ०२ नुसार दि. २९ एप्रिल २०१९ रोजी संपन्न झालेल्या मा. अधिष्ठाता मंडळ बैठकीत ऐनवेळचा विषय ०३ (०८)१५–२०१९ अन्वये मा. विद्या परिषदेकडे संलग्नीकरणाच्या नुतनीकरणसाठी शिफारस करणेकरीता ठेवण्यात आला होता. या संदर्भात मा. अधिष्ठाता मंडळाने महाविद्यालयास त्रुटी कळविण्यात याव्यात व एक वर्षात सदर त्रुटीची पूर्तता करण्याबाबत कळविण्यात यावे. तसेच त्यानंतर शैक्षणिक वर्ष २०१९–२० या एक वर्षाचे संलग्नीकरण देण्याची शिफारस मा. विद्या परिषदेकडे करण्यात आली.

मा. विद्या परिषद बैठकीत विषय क्र. २१/४३–२०१९ अन्वये मा. अधिष्ठाता मंडळाने केलेल्या शिफारशीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली त्यामुळे आपणास शैक्षणिक वर्ष २०१९–२० करीता महाविद्यालयातील उपरोक्त अभ्यासक्रमास संलग्नीकरण प्रदान करण्यात येत आहे.

मा. अधिष्ठाता मंडळ व मा. विद्या परिषदेने संमत केलेल्या ठरावानुसार आपणास कळविण्यात येते की, समितीने विद्यापीठास सादर केलेल्या त्रुटी अहवालाची प्रत यापूर्वीच आपणास प्रत्यक्ष देण्यात आलेली आहे. त्यानुसार असलेल्या

त्रुटीची पूर्तता एक वर्षाच्या आत करण्यात येईल असे रु. १००/— च्या बंधपत्रावरील हमीपत्र तात्काळ विद्यापीठात सादर करावे. अन्यथा शैक्षणिक वर्ष २०२०—२१ करीता आपल्या महाविद्यालयातील उपरोक्त अभ्यासक्रमास कोणत्याही प्रकारचे संलग्निकरण प्रदान करण्यात येणार नाही, कृपया याची नोंद घेण्यात यावी. कळावे.

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
शैक्षणिक (संलग्नीकरण) विभाग